ISSN 2231-1629
Knowledge Resonance
● Vol-9 No. 2 ● July-December 2020

# भारतीय लोकशाही आणि महिला सक्षमिकरण

**प्रा. विजय शामरावजी कांडलकर**
सहा. प्रा. (राज्यशास्त्र विभाग)
संताजी महाविद्यालय, नागपूर

**सारांश :—**

लोकशाही विकेंद्रीकरणातील शेवटचा मात्र तीतकाच महत्वपूर्ण घटक म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थेकडे बघीतले जाते. महीलांचे सक्षमिकरणाच्या दिशेने स्त्रियांचा राजकीय सहभाग वाढणे हे सुध्दा तेवढेच महत्वाचे आहे. 73 व्या व 74 व्या घटना दुरूस्तीने स्त्रियांना स्थानिक स्वराज्य संस्थेत 33 टक्के आरक्षण देण्यात आले. हेच आरक्षणाचे प्रमाण 2011 च्या निवडणुकीत 50 टक्के करण्यात आले. महिला सबलीकरणाच्या दृष्टीने ही अंत्यत महत्वाची बाब आहे. त्यामुळे पंचायतराज संस्थामधील सत्तेची दारे महिलांसाठी खुली झाली आणि मोठया प्रमाणात महिला राजकारणात पूढे आल्या आणि मुक्तपणे विविध क्षेत्रात भरारी घेऊ लागल्या आहेत.

**बिज शब्द :—** लोकशाही, सक्षमिकरण, पुरूषी वर्चस्व, समानता, धार्मिक गुलामगीरी, भारतीय संविधान, स्त्री चळवळ, शैक्षणिक पातळी, स्त्रियांचा दर्जा.

जगात लोकशाही हा शासनाचा असा एकमेव प्रकार आहे की, ज्यात प्रत्येकाचा समान वाटा समजला जातो. स्वातंष्य समता, बंधूता, प्रतिष्ठा या सर्व तत्वांची उपलब्धता खऱ्या अर्थाने व्यक्तीला लोकशाहीतच उपलब्ध होत असते. या सोबतच सहकार्य, शिल, सचोटी, धारिष्टय, समर्पन आदी लोक गुणांचा विकास हा लोकशाहीतच संभव आहे. म्हणूनच व्यक्ती जीवनात एक क्रांतीकारी बदल घडवुन आनणारी शासन पध्दती म्हणुनच भारतात लोकशाही शासन पध्दतीचा स्विकार करण्यात आला आहे. अनेक वर्षे गूलामीत खीतपत पडलेल्या भारतीय समाजातील विविध घटकांना त्यांचे हक्क व न्याय प्राप्त करून देणे हा मोठा प्रश्न आवासून उभा असतांना लोकशाही या शासन प्रकारा शिवाय दुसरा शासन प्रकार हा घटना निर्मात्यांना योग्य वाटत नव्हता व ते साहजिकच होते.

वर्षानूवर्षे उपेक्षीत असलेल्या विशिष्ट अशा समाजा बरोबरच स्त्री या महत्वपूर्ण घटाकांचा विचार केला असता तीची स्थिती आर्थिक, सामाजिक सांस्कृतीक इ. प्रथा व पंरपरने स्त्री जीवन हे जखडुन गेलेले होते. प्रस्थापित समाज व्यवस्थेने धर्माच्या नावाखाली तीच्या अधिकारांचा हनन करून तीचे शोषण चालविले होते. अशा या वंचित, शोषीत, पीडीत स्त्री घटकाला तीला तीच्या अधिकाराची उपल्ब्धता करून व तिचा सर्वांगीण विकास साध्य करून समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे हे अगत्याचे असल्यामुळे लोकशाही हा परीवर्तनशिल शासन प्रकार जसा उपयुक्त होता तसाच तो आजही परिणामकारक आहे.

स्त्री अधिकार, त्यांची प्रतिष्ठा यांचे हनन व शोषण हा विशिष्ठ काळापूरताच मर्यादीत विषय नाही तर आधूनिक काळातही पुरूषी वर्चस्वाच्या मानसीकतेतून तीची होणारी परवड थांबलेली दिसत नाही. लोकसंख्येच्या निम्याहुन अधिक भागाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अशा या महत्वपुर्ण घटकांवर होणारा अन्याय दुर करून देशाचा सर्वांगीण विकास साध्य करण्याच्या दृष्टिने भारतीय लोकशाहीत स्त्री सक्षमीकरण होणे गरजेचे आहे. जेणे करून महिलांचा सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतीक अशा विविध अंगाने विकास होऊ शकेल. महिलांच्या सबलीकरणाची ही प्रक्रीया साध्य करण्यासाठी पुरूषी वर्चस्वाच्या मानसिकतेला तडा देणे हेही तीतकेच अगत्याचे आहे.

**महिला सक्षमीकरण आणि लोकशाहीची अनिवार्यता :—**

व्यक्तीचे स्वातंष्य आणि मूलभूत हक्क यांचे रक्षण खऱ्या अर्थाने हे लोकशाही व्यवस्थेतच केले जाऊ शकते. याचा अर्थ देशातील सामान्य जनतेला खराखुरा न्याय मिळवून देण्याचे कार्य हे लोकशाही व्यवस्थेतच उत्तमरीत्या पार पडु शकते. या विश्वासातुनच आपल्या घटनाकांरानी लोकशाही पर्यायाची निवड केली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विधान या संदर्भात खुप समर्पक वाटते ते म्हणतात. 'लोकशाही म्हणजे रक्तपात विरहीत मार्गानी लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात क्रांतीकारक बदल घडवून आणणारी शासन पध्दती होय.' 'एका व्यक्तीला एक' मत या ऐवजी 'एक व्यक्ती एक मुल्य' हे तत्व त्यांना अभिप्रेत होते. मानवी हक्क समाजातील सर्व स्त्री—पुरूषांना प्रत्यक्ष उपभोगता येतील अशी स्थिती निर्माण केली जाणे त्यांना अगत्याचे वाटत होते आणि म्हणूनच त्या अनुशंगाने लोकशाहीचा पुरस्कार हा त्यांना उत्तम असा मार्ग वाटत होता. फॅसिझम, साम्यवाद, हुकूमशाही अशा कोणत्याही शासन पध्दतीत व्यक्ती स्वांतत्राची हमी प्राप्त होत नाही. केवळ लोकशाहीतच ते शक्य होत असते. तेथे सामान्य ते असामान्य मानसात सत्ता प्राप्तीची

सोय आणि सामाजिक व राजकीय प्रतिष्ठा प्राप्त होऊ शकते किंवा प्राप्त करता येते. भारतातील उच्च–निचतेची पालेमुळे, अस्पृश्यावरील अन्याय, सामाजिक विषमता, स्त्रियांचे शोषण यावर लोकशाही शासन पध्दतीतच प्रभावी उपाय योजना होऊ शकतात. सर्वाना समान संधी, स्वातंत्र्याची हमी व सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय मिळण्याची हमी ही केवळ लोकशाही शासन प्रणालीतच शक्य आहे. कोणावरही जुलुम जबरदस्ती होणार नाही याची खात्री असते. अशा लोकशाही शासन पध्दतीत स्त्री स्वातंत्र्यावर विशेष लक्ष केंद्रीत करता येते. कायद्यासमोर समानता ही लोकशाहीची मोठी देणगी मानली जाते. लोकशाहीत बहुसंख्याकाच्या हातात सत्ता असली तरी अल्प संख्याकांच्या मताची कदर केली जाते. समाजातील उपेक्षीत घटकांच्या उथ्थानासाठी व त्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी विशेष योजना आखल्या जातात. शिवाय अशा घटकांना विशेष प्रोत्साहन देऊन त्याप्रमाणात संधीही उपलब्ध करून देता येने शक्य होत असते. त्यामुळेच महिलां सक्षमीकरणाचा हेतू साध्य करण्यासाठी लोकशाही हा एक उत्तम असा शासनाचा प्रकार आहे.

**भारतातील महिला सक्षमिकरण :–**

भारतात महिला सक्षमिकरणाचा पाया खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य पुर्व काळातच अनेक थोर समाज सुधारकांनी व महापुरूषांनी घातलेला आहे. समाजात प्रचलीत असलेल्या जाचक रूढी, प्रथा व पंरपरे विरूध्द आवाज उठवून स्त्रियांना शिक्षणाचे दार उघडुन दिले व या शिक्षणातूनच त्यांना खऱ्या परिस्थितीचे ज्ञान मिळून धार्मिक कर्मकांड व पुरूषी मानसितेच्या वर्चस्वातून मुक्त होण्याचा मार्ग गवसला. त्या सर्व महापुरूष व समाज सुधारकांनी लोकशाहीतील मुल्याचा स्वीकार केला होता. किंबहुना तसे संस्कारही झाले होते. मात्र खऱ्या अर्थाने महिलांच्या सक्षमिकरणाची गती ही स्वातंत्र्यानंतर प्राप्त झाली. भारतीय घटनाकारांनी उपेक्षीत, शोषीत व विविध अधिकारापासून वंचीत असलेल्या स्त्रीला राज्यघटना व त्यात करण्यात आलेल्या तरतूदीच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने न्याय मिळवून देण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

देशाला स्वातंत्र्य मिळुन विशिष्ट समाज हा त्या स्वातंत्र्याची फळे चाखत असतांनाच बहुसख्य समाज हा त्या स्वातंत्र्यापासून कोसो दुर होता. हा समाज अनिष्ट चालीरीती, प्रथा, पंरपंरा यांच्या सामाजिक, धार्मिक गुलामगीरीत अडकला होता. त्यातच स्त्रियांची स्थिती ही फारच दयनिय होती. विशिष्ट समाज चौकटित तीचे कार्यक्षेत्र मर्यादित करून तीचे जीवन संकुचीत करण्यात आले होते. या परिस्थितुन स्त्रियांना बाहेर काढण्यासाठी व तीला विकासाच्या मुख्य प्रवाहात आनण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान हे अनन्य साधारण आहे. स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री झाल्यानतंर डॉ. आंबेडकरांनी स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने समान हक्क मिळवून देणारा घटनात्मक मसुदा तयार केला. भारतीय स्त्रिला धार्मिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय असे संपूर्ण अधिकार बहाल करण्याच्या दृष्टिने हिंदु कोड बिल तयार केले व स्त्रियांना आत्म सन्मानाची सनद बहाल केली.

**भारतीय संविधानातील तरतूदी व महिला विषयक कायदे**

भारतीय समाज जीवन व त्यातील स्त्रियांची एकंदरीत स्थिती याचा सखोल निरीक्षण व परिक्षण करूनच स्त्री – पुरूष समानता या तत्वाचा पुरस्कार करणाऱ्या लोकशाहीच्या आधारावरच स्त्रियांना संरक्षण देण्याच्या हेतुनेच संविधानात अनेक तरतुदी केलेल्या आहेत. या तरतुदी म्हणजेच महिला सक्षमिकरणाच्या कायदेशीर बाजु आहेत.

1) स्त्री पुरूष दोघासाठी समान कायद्याची तरतुद.
2) नोकरी/इतर हक्क देतांना स्त्री–पुरूष असा भेदभाव करण्यास मनाई.
3) स्त्रियांच्या कामाच्या स्थळी त्यांच्या मुलांची विशेष सोय असणे.
4) मतदानाचा अधिकार.
5) स्थानिक स्वराज्य संस्थेतील 33 टक्के आरक्षण.
6) प्रसूतीसाठी हक्काची रजा इ.

भारतीय संविधानात स्त्रियांचा दर्जा सुधारण्यासाठी, समान न्याय व संरक्षण मिळून आरोग्य, शिक्षण, उत्पादन क्षमता इ. विषयांशी सबंधीत समस्याचे निर्मुलन करण्यासाठी तरतूद करतानांच विकासाच्या सर्व क्षेत्रात समान वाटा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशानेच अनेक कायदेही करण्यात आले आहेत.

**1) हिंदु विवाह विषयक कायदा – 1955**

2) वारसा विषयक कायदा – 1956

3) दत्तक घेण्याचा हक्क – 1956

4) अनैतीक व्यापाराला आळा घालणारा कायदा – 1956

5) हुंडाबदीचा कायदा – 1961

6) गर्भपाताचा कायदा – 1972

7) गर्भजल परिक्षण विरोधक कायदा – 1988

8) कौटुबिंक छळ प्रतिबंधक कायदा – 2005 तसेच

9) मुस्लीम महिला (विवाह संरक्षण) अधिनियम – 2019

**लोकशाहीला पुरक अशी स्त्री चळवळ :–**

स्त्रियांच्या हितासाठी व त्यांच्या संरक्षणासाठी ज्या काही कायद्याची निर्मिती करण्यात आलेली आहे. त्या कायदयाचा इतिहास पाहिला तर ते कायदे करून घेण्यासाठी प्रथम थोर समाज सुधारकांना, व सुधारणासाठी विचारवंताना आणि त्यांनतर आकारासाठी आलेल्या स्त्री चळवळीला अनेक वर्षे झटावे लागलेले आहे. त्यानंतरही कायदे पुर्णपणे स्त्रियांच्या हिताचे राहीलेले नाहीत म्हणून त्यांच्यात सुधारणा घडवून आणण्यासाठीही संघर्ष करवा लागत आहे. हा संघर्ष करतांना आंदोलने, मोर्चे, निदर्शने व शेवटी न्यायालयीन प्रक्रीया पुर्ण करणे हया सर्व बाबी लोकशाहीच्या तत्वाशी निगडीत अशाच आहे. केवळ लोकशाही मध्येच आपल्या मागणी व हक्कासाठी प्रस्थापीत विरोधी विरोध प्रकट करण्यासाठी चळवळ उभारण्याचे स्वातंत्र्य प्राप्त होत असते.

लोकशाहीत प्राप्त होणाऱ्या मूलभूत अधिकारामूळे व उपलब्ध परिस्थितीमुळेच वर्तमान काळात स्त्रियांच्या प्रश्नावर महिला एकत्र येऊन संघटनाच्या माध्यमातून आंदोलने करतांना दिसतात. स्त्रियाच्या या मोहीमेत बलात्कार झालेल्या स्त्रीला बेआब्रु होण्याची, समाजाने वाळीत टाकण्याची भीती, निर्दोष सुटणारे गुन्हेगार या समळया अडचणी येत होत्या. त्यासाठी महिला संघटनांनी जाहीर निदर्शने, पोलीस ठाणी, न्यायालयामूळे मोर्चे, कायद्यात बदल घडवून आणण्यासाठी आवाज उठविणे, जनमत जागृतीसाठी सभा, पथनाटये प्रदर्शने या मार्गाने केलेल्या प्रयत्नामुळेच समाजात जागृती होऊ लागली. त्यातुनच बलात्काराचा निषेध करणे, स्त्रियांचे पांरपारिक अहवाल पण नाकारने, स्त्रियांच्या कनिष्ट दर्जा नाकारने यासारख्या गोष्टींना पुरोगामी विचारात महत्व मिळू लागलेले आहे. एकुण या सर्व बाबीसाठी पोषक वातावरण हे लोकशाहीतच शक्य होत असल्याने स्त्री चळवळ व त्या चळवळीची वाटचाल ही लोक शाहीतील मुल्यांशी व तत्वाशी निगडीत तसेच पुरक असते.

**महिला सक्षमिकरणातील आवाहने :–**

भारतीय घटनाकारांनी प्रदिर्घ विचार विमर्शना नंतरच व सखोल अभ्यास करूनच भारतीय इतिहास व वर्तमान स्थिती तसेच भविष्य काळात उद्भवणारी परिस्थिती याचा वेध घेत लोकशाही या शासन प्रकाराचा अंगीकार केला आहे. त्यातच पुर्वापार अन्याय झालेल्या व दुर्लक्षीत राहीलेल्या स्त्री या घटकांची गांभीर्याने दखल घेवुन त्या संबधात संविधानात काही तरतूदीही केल्यात व त्या अनुषंगाने विविध कायद्याचीही निर्मिती करण्यात आलेली आहे. अर्थात भारतीय लोकशाहीत महिला सक्षमीकरणाचा विचार प्राधान्याने केला आहे. त्यातच समाज प्रबोधनाच्या अनेक चळवळी भारतीय समाजात कार्यरत आहेत. भारतीय लोकशाहीची वाटचाल महिला सक्षमीकरणाकडे असतांनाच काही समाज विघातक प्रवृत्तीमुळे या सक्षमिकरणापुढे अनेक आवाहने सूध्दा उभी टाकलेली आहेत. हे सूध्दा एक कटु सत्य आहे. ते पूढील प्रमाणे सांगता येतील.

1) स्त्रियांच्या मनावरील धार्मिक रूढी व अनिष्ट चालीरीती यांचा पगडा.
2) कायद्याच्या अंमलबजावणीतील त्रुटी.
3) समाजातील अनिष्ट रूढी व परंपरा.
4) वाढता चंगळवाद.
5) समाजातील स्त्री शोषण उदा. हुंडाबळी, हत्या, भृणहत्या.
6) राजकर्त्या वर्गाची उदासीनता.
7) पुरूषी वर्चस्वाची मानसिकता.

याचा अर्थ असा नाही की, या सर्व आवाहनावर मात करता येणे शक्य नाही. वास्तवीक पाहता कायद्याचा आधार, स्त्री चळवळ, शासनाच्या विविध योजना व उपक्रम इ. च्या माध्यमातून त्या आवाहनावर तोडगा काढण्याचा सकारात्मक प्रयत्न सुरूच आहे. या सर्व आवाहनाची तीव्रता आज तेवढी नसली तरी या सर्व बाबीनी भारतीय लोशाहीवर निश्चितच प्रभाव टाकलेला दिसून येतो. असे असूनही स्त्रियांचा दर्जा, समानता, शिक्षण, आरोग्य, सरंक्षण उत्पादन क्षमता इत्याइी प्रश्नाबाबत धोरणात्मक उद्दिष्ट ठरविली जात आहेत. स्त्रियांचे दारिद्रय कमी करणे स्त्रिया व मुलीसाठी शैक्षणिक पातळी व आरोग्य सेवेचा दर्जा वाढविणे, घरातील स्त्रियांना कायद्याचे वाढते संरक्षण देणे या गोष्टींना अग्रक्रम देऊन भारतात अनेक धोरणे आखली जात आहेत. या सर्व बाबी हया लोकशाहीतील मुल्यांशी सांगड घालणाऱ्या आहेत हेही तेवढेच खरे.

**समारोप :–**

महिला लोक प्रतिनिधीच्या निहीत कामकाजामुळे राजकारण व विविध क्षेत्राती वाढलेल्या सक्रिय सहभागामुळे इ. त्यांच्या स्वतःच्या विकासाकरीता जास्त फायदा झालेला आहे. आजमितीस स्त्रियांची क्षमता वाढत असून त्या स्वावलंबी होत आहेत. स्त्रियांवरील अत्याचार संबधी विविध कायदे, स्त्रियांच्या

आर्थिक स्वातंष्यासंबधी निर्णय, स्त्रियांचा दर्जा वाढविण्या संबधी विविध कायद्याची अमंलबजावणी, समान नागरी कायदा व शासन आणि प्रशासन यांचे अनेक उपक्रम व योजना यामुळे त्यांच्यात जागृती होऊन त्या अन्याया विरूध्द आवाज उठवित आहेत. महिला सबलीकरणाच्या दिशेने ही बाब निश्चितच आशादायी व तीतकीच सकारात्मक आहे.

***संदर्भ ग्रंथ सूची :–***

1) *फाडीया बि. एल, राजनिती विज्ञान, प्रतियोगीता साहीत्य प्रकाशन, आग्रा, 2014*

2) *साबळे, भारतीय शासन आणि राजकारण, हिमालया पब्लीसींग हाऊस 2004*

3) *पाटील. व्ही. बी. महाराष्ट्रातील पंचायतराज व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था, के सागर पब्लीकेशन्स पुणे, 2005*

4) *शहा घनशाम, भारतातील सामाजिक चळवळी.*

5) *व्होरा राजेंद्र आणि पळशीकर सुहास (संपादित) भारतीय लोकशाही धर्म आणि व्यवहार, डायमंड पब्लकेशन्स, पुणे, 2010*